# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## निदेश क्र. ३४/२०२२

**''विद्यापीठ शिक्षकेत्तर पदावरील सरळसेवा प्रवेश, पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, साक्षात्कारासाठी गुणवत्ता ठरविण्याकरिता परीक्षा पध्दती आणि निवड समितीची रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश,२०२२.''**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्रातील सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठाकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७) (यापुढे अधिनियम, २०१६ असा उल्लेख केल्या जाईल.) हा दिनांक १ मार्च २०१७ पासून लागु करण्यात आला असून हा अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (यापुढे "विद्यापीठ" असा उल्लेख) या विद्यापीठाला सुद्धा लागु करण्यात आला आहे.

**आणि**

**ज्याअर्थी,** अधिनियम २०१६ च्या कलम ७१(२०) प्रमाणे विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवा शर्ती संबंधी विद्यापीठाव्दारे महाराष्ट्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत अधिनियम निर्गमित करण्याचा अधिकार विद्यापीठास प्रदान करण्यात आलेला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाच्या १) शासन निर्णय क्र. जीयुजी २०११/(१०४/११)/विशी–१ दिनांक १६ मे, २०११, २) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण–२०१२/(२८९/१२)/विशी–१ दिनांक ०५ डिसेंबर, २०१३, ३) शासन निर्णय क्रमांक: पदनि २०१५/प्र.क्र.७२५/१५/विशी–१ दिनांक ०३ जुलै,२०१७ व ४) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण–२०१६/प्र.क्र.६१३/विशी–१ दिनांक १९ सप्टेंबर, २०१९, नुसार विद्यापीठास एकंदरीत १९३ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे (सरळसेवा तसेच पदोन्नतीद्वारे भरावयाची एकंदर पदे) मंजुर करण्यात आली आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** विद्यापीठ आस्थापनेवरील मंजुर वर्ग–१, वर्ग–२, वर्ग–३, आणि वर्ग–४ मध्ये समाविष्ट पदावर सरळसेवा भरती प्रक्रीयेसाठी परीक्षेचे आयोजन, व्याप्ती आणि वर्गवारीनुसार परीक्षेचे स्वरूप ठरवून परीक्षा आयोजित केल्या जाण्यासंबधी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिनांक ०७/०५/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्रमांक ४ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाद्वारे राज्य शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे शासन निर्णय

क्रमांक:एसआरवी—२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विपधो २६२०/प्र.क्र.१६/का. १७ दि. ३१ मार्च, २१२१ मध्ये "प्रशासकिय विभागांमार्फत ज्या पदासाठी विभागीय परिक्षा आयोजित करण्यात येतात अशा सर्व विभागीय परिक्षा संदर्भातील सामाईक बाबीचे धोरण निश्चीत करण्यात येत आहे असे नमुद करण्यात आले असून सदर धोरण हे केवळ राज्य शासकिय कर्मचा—यांनाच लागू राहील हे धोरण जिल्हा परिषदा/नगरपालिका/महानगरपालिका/शासनाच्या अधिपत्याखालील मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे/अन्य निमशासकिय आस्थापनेमधिल कर्मचारी यांना लागू होणार नाही असे नमुद करण्यात आले असल्याने पदोन्नतीकरिता विभागीय परिक्षा न घेण्याचे विद्यापीठाने निश्चित केले आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** वरील उल्लेखित दिनांक ०१/०८/२०१९ चा शासन निर्णय आणि दिनांक ०७/०५/२०१८ रोजीचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णयाचा समावेश करून अधिनियम २०१६ च्या कलम ७१(२०) नुसार विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सरळसेवा नियुक्ती आणि पदोन्नती संबधात योग्य अशा परिनियमाचे निर्गमन करणे आवश्यक असल्याकारणाने पंरतु अशा तऱ्हेचा परिनियम निर्गमित करण्याची प्रक्रीया क्लिष्ट आणि वेळखाऊ असल्यामुळे त्यासंबधातील पर्यायी व्यवस्था म्हणून अधिनियम २०१६ च्या कलम १२(८) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून पुर्ननिर्गमित केलेला निदेश क्र.०७/२०२२(अ) कलम १२(८) च्या पंरतुका मधील तरतुदीनुसार दिनांक ११/१०/२०२२ रोजी आपोआप व्यपगत झाला असल्यामुळे व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रकरणे प्रलंबित असल्याने व्यपगत झालेल्या निदेश क्र. ०७/२०२२ (अ) च्या तरतुदींच्या समावेश करून आवश्यक बदलांसहीत नवीन निदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

**आणि**

**त्याअर्थी,** मी. डॉ. प्रशान्त श्री. बोकारे, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये खाली नमुद असलेले निदेश निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला ''विद्यापीठ शिक्षकेत्तर पदावरील सरळसेवा प्रवेश, पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, साक्षात्कारासाठी गुणवत्ता ठरविण्याकरिता परीक्षा पध्दती आणि निवड समितीची रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२२'' असे संबोधण्यात येईल.
२. हा निदेश ज्या तारखेला निर्गमित करण्यात येईल त्यातारखेपासून अमंलात येईल.
३. हा निदेश महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र शासनाने शिक्षकेत्तर पदांच्या सेवाशर्तीनुसार सरळ सेवाभरती व पदोन्नती विषयी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, शासन राजपत्र,

शासन परिपत्रक, आदेश, विनियम इत्यादी मधील तरतुदींच्या अधिन राहून विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदावरील सरळसेवाद्वारे तसेच पदोन्नतीद्वारे करावयाच्या नियुक्त्यासह लागू होईल.

४. विद्यापीठ आस्थापनेवरील सर्व पद वर्गवारीतील सरळसेवा भरतीसाठी स्वत:ला पात्र समजणाऱ्या उमेदवाराला आवेदन पत्राचे शुल्क म्हणून खाली नमुद असलेली राशी धनाकर्षाद्वारे आवेदन पत्रासोबत भरावी लागेल.

अ) सर्वसाधारण वर्गवारीचा उमेदवार रूपये ५००/—

ब) राखीव प्रवर्गातील उमेदवार रूपये ३००/—

पद वर्गवारीनिहाय विद्यापीठाला जे अर्ज प्राप्त होतील त्या अर्जांमधून पात्रता धारक उमेदवार शोधून काढण्यासाठी सर्व अर्जांची छानणी करण्यात येवून पात्रताधारक उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल आणि पात्रताधारक उमेदवारांना सरळ सेवाभरती प्रक्रियेसाठी आयोजित परीक्षेमध्ये सामावून घेण्यात येईल.

५. अ) वर्ग १, वर्ग २ आणि वर्ग ४ पदावरील सरळ सेवाभरती प्रक्रियेसाठी लेखी, परिक्षेचे आयोजन करण्यात येवून परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर पदनिहाय गुणवत्ता यादी तयार करून उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. वर्ग ३ मध्ये समाविष्ट पदाकरिता लेखी आणि संगणकीय परीक्षांचे आयोजन केले जाईल. परिक्षांमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करून उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

ब) पद वर्गनिहाय आयोजित परीक्षांमध्ये उमेदवाराने प्राप्त केलेले एकूण गुण विचारात घेवून ही गुणवत्ता यादी तयार केली जाईल. या यादीमधील उमेदवारांना खाली नमुद असलेल्या सुत्रानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**सुत्रः—**

पदभरती संख्या — १ (गुणवत्ता यादीनुसार ८ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — २ (गुणवत्ता यादीनुसार १० उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ३ (गुणवत्ता यादीनुसार १२ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ४ (गुणवत्ता यादीनुसार १४ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ५ (गुणवत्ता यादीनुसार १६ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)

क) मुलाखतीसाठी बोलविलेल्या उमेदवांरामधून निवडसमितीद्वारे उमेदवाराची निवड करण्यात येईल. ही निवड केली जाण्यासाठी निवड समितीमध्ये समाविष्ट असलेल्या सदस्यांची संख्या विचारात घेण्यात येईल. निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास एकूण १० गुणांमधून गुणदान प्रदान करण्याचा अधिकार प्राप्त असेल. निवड समितीच्या प्रत्येक सदस्याने मुलाखती मधील उमेदवाराच्या कामगिरीच्या आधारावर १० गुणांपैकी गुणदान केल्यानंतर निवड समितीच्या उपस्थित सदस्यांच्या गुणदानाची बेरीज करण्यात येईल आणि निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या गुणांच्या एकूण बेरीज संख्येला निवड समितीच्या सर्व उपस्थित सदस्याच्या एकूण संख्येने विभाजित केल्यानंतर येणारी संख्या म्हणजे सदर उमेदवाराने १० गुणांपैकी प्राप्त केलेल्या गुणांचा आकडा असेल.